चैतन्य लहरी

मराठी आवृत्ती

खंड I अंक 7



परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी

जय श्री माताजी

श्री महाविराट पूजा न्यूयार्क - 11 जून 1989

श्री कृष्णांच्या भूमिमध्ये श्री माताजीची महाविराटाच्या रूपात पूजा करण्याची संधी होती. विराट हे श्री विष्णूंचे सर्वोच्च अवतरण होय. श्री माताजींनी सांगितले की ही महाविराटांची आपल्या मेंदू मधे पूजा करण्याची संधी होती कारण श्रीकृष्ण महाविराट आहे. श्री विराट हे आपल्या मेंदूमधील संपूर्णत्व आहे तर, वास्तवता ही हृदयात वास करते. ही वास्तवता संपूर्णत्यामागील सूक्ष्मता आहे. हृदय आणि मेंदू यांच्यामधील विभाजन हे धोकादायक आहे. जेव्हा मेंदूचे हृदयाकडून पोषण होत नाही, तेव्हा लोक हे बाह्यकेंद्रित व निर्दयी बनतात. जेव्हा हृदयाचेच वर्चस्व असते, तेव्हा माणसे ही आळशी व स्वतःमधेच गुंतणारी होतात.

श्रीमाताजी म्हणाल्या की, अनेक साधक {योगी} लोकांनी संपन्न असलेली ही मोठी, प्रचंड व महान भूमि आता अनेक बांधाच्या जाळ्यात अडकलेली आहे. तिथे लोकांच्या जीवनामध्ये अनैतिमत्ता, मुर्खपणाची ध्येयहिनता, उथळता आणि निरर्थकपणा आहे. श्री माताजींनी समजावले की, अमेरिका व इतर पाश्चिमात्य देशांमध्ये डावी बाजू ही उजव्या बाजूवर राज्य करीत आहे. ही पूर्वी पाश्चिमात्य लोकांनी मूळच्या लोकांवर दबाव आणल्यामुळे झालेली प्रतिक्रिया आहे. परिणामतः ते आळशी झाले. भरपूर श्रीमंतीमुळे देखील आत्मकेंद्रीपणा आलेला आहे, जो लोकांना वास्तवतेबाबत आंधळे बनवितो. वास्तवता, जी हृदयात आहे, क्रियेमधून प्रगट झाली पाहिजे. ती होण्यासाठी आपल्याला अजून कार्यशील झाले पाहिजे.

श्री माताजींनी विस्तृत केले की, आत्मसाक्षात्काराआधी असलेल्या प्रवृत्ति अटी तटी व बंधने संपलेल्या नाहीत, तर सूक्ष्मतर आणि सुक्ष्मतम झालेल्या आहेत. आपल्या स्वतःच्याच आत्मसंकुचित-पणामध्ये आणि स्वतःच्याच लहानसहान अडचणींमध्ये गुंतल्यामुळे आपण त्या भयानक चक्रामध्ये अडकलो जातो. 'विराट बनण्यासाठी आपण आपल्यालाच संतापाशिवाय दुसऱ्याला न दुखविता, तपासले पाहिजे आणि स्वतःच्या उन्नतिसाठी काहीतरी करावयाचे ठरविले पाहिजे. आपण म्हणू आम्ही आईवर प्रेम करतो, परंतू त्यासाठी काय करत आहोत?

एकदा का आपण आपल्या आतमध्ये सुधारणा करायला लागलो, तर सर्व गोष्टी आश्चर्यकारक-रित्या काम करायला लागतील व सहजयोगी हे महान बनतील. बाहेरदेशील सहजयोग्यांना काहीतरी बनायचास पाहिजे, त्यांच्याकडे काहीतरी विशष पाहिजे आणि समाजात त्यांना काहीतरी स्थान पाहिजे.

अमेरिकेतील सहजयोग्यांनी, उजव्या बाजूला असण्याची भीती सोडून दिली पाहिजे. यावर श्री माताजींनी भर दिला आणि सामान्यतः फक्त आळशीपणाला बळकट करण्यासाठी केलेली विधाने आहेत. परंतु त्यांच्यामध्ये शिस्त पाहिजे. लवकर उठून स्नान करून पूजेसाठी बसले पाहिजे, जीवनपध्दती बदलली पाहिजे व क्रियाशील आणि तपस्वी जीवन जगले पाहिजे.

श्री माताजींनी सांगितले की, इंग्लंड व अमेरिकेमधील पुष्कळ सहजयोगी हे स्वतःहून काम करणारे नाहीत आणि सहजयोग पसरविण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर घेत नाही. त्या म्हणाल्या तपस्या तिथेच आहे जेथे आपण रहातो. निरासक्ति इथेच कार्यान्वित झाली पाहिजे" आपल्याला आपल्या आईचे आदर्श पाळले पाहिजेत आणि सहजयोगासाठी झटून काम केले पाहिजे. जसे एखादे फुल, फळ होण्यासाठी स्वतःचे पुष्कळ भाग टाकून देते, त्याचप्रमाणे आपल्याला आपल्या प्रवृत्त्या सोडून द्यायला पाहिजेत. हे आपल्याला सर्व दैवी विद्या मिळण्यास स्वतंत्र करते. आपल्याला कुठलाही त्याग करायला नको, फक्त सावध रहा आणि आपल्याला सहजयोगी म्हणून असलेल्या स्थितीची जाणिव ठेवा. प्रत्येक माणसाने वर आले पाहिजे."

श्री माताजींनी आपल्याला सहजयोगाबद्दल अधिक मोकळेपणाने बोलायला सांगितले. सहज-योग्यांनी, ज्यांच्याकडे अर्थपूर्ण कल्पना आहेत, अशा सामाजिक नेत्यांना भेटले पाहिजे आणि त्यांना सहजयोगाबद्दल सांगितले पाहिजे. परंतू सहजयोग्यांनी, सहजयोगाच्या सुंदर, प्रेमळ गुणधर्मांना प्रतिबिंबीत केले पाहिजे. त्यामुळे संबंधाना बरोबर चालना मिळेल. आपण हे पक्के समजून घेतले पाहिजे की आपण सहजयोगाबद्दल सौजन्य दाखवित नाही. परंतू प्रत्येक व्यक्तिला स्वतःला स्वतःला आणि सर्वजणांना सामुहिकरित्या सहजयोगाची गरज आहे.

श्री माताजींनी प्रत्येक सहजयोग्याला, त्यांच्या कॅसेटची कॉपी घ्यायला सांगतली व ती नीट अभ्यासून त्यामध्ये असलेल्या ज्ञानाच्या स्वातंत्र्याला सामोरे जायला सांगितले. श्री माताजींनी आपल्याला हृदयापासून प्रार्थना करायला सांगितली की, धारणा जी आधी विराट म्हणून होती ती आपल्या आयुष्यात सरीसुरी करून दाखवली पाहिजे. मुळचे आदिवासी अमेरिकन लोक आध्यात्मिक जीवन कसे जगावे हे जाणत होते. खूपच स्वतंत्र आणि निरासक्त होते. जर आपण स्वतःला सुधारले नाही तर सामुहिक पातळीवर खूप प्रश्न उद्भवतील आणि जर सामुहिकतेमध्ये काही दोष असतील तर ते प्रत्येक भागामध्ये प्रतिबिंबित होतील. आपल्यापैकी प्रत्येकाला विराट बनायचे आहे व स्वतःची किंमत दाखवायची आहे आणि आपल्याला या देशाला बदलवून टाकण्यासाठी अधिक गहनतेत गेले पाहिजे.

## श्री महाकाली पूजा - भाषण

## व्हॅंकुव्हर - 17 जून 1989

सर्वप्रथम पृथ्वीवर महाकाली तत्व आले आणि तिने श्री गणेशांना निर्माण केले. नंतर महासरस्वतीने हे सुंदर विश्व निर्माण केले आणि मानव जातीस बरोबर योग्य असे तापमान तयार केले. ह्या वातावरणामुळे माणसांमधील साधकवृत्तीवर परिणाम झाला, भारतामध्ये ध्यानासाठी चांगले तापमान आहे. त्यामुळे साधकांसाठी चांगली परिस्थिती निर्माण झाली, ज्यांनी नंतर सत्याचा शोध घेतला व कुंडलिनीला शोधले.

ह्या लोकांनी दूर जाऊन विद्यापीठे सुरू केली. मुले पाच वर्षाची झाली की त्यांना शाळांमध्ये पाठविले जाऊ लागले. शाळेमध्ये असताना मुलांनी ब्रम्हचर्य व्रत पाळले. हीच प्रथा आधुनिक काळा-पर्यंत चालत आली आहे. भारतामध्ये एकाच विद्यापीठातील विद्यार्थी एकमेकांशी लग्न करु शकत नाही. अशाप्रकारे मुलाधार अनेक प्रकारे स्वच्छ ठेवले गेले, परंतू इतर देशांमध्ये ह्याकडे फारसे लक्ष पुरविले गेले नाही.

ज्यांचे मूलाधार कच्चे आहे त्यांना लगेच बाधा पकडतात. म्हणूनच सर्व अगुरू पश्चिमेकडे आहे आणि यशस्वी बनले, परंतू ते आता मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहेत. ही आपणास बळकट बनविणारी आपल्यामधील महाकाली शक्ती आहे कारण ते श्रीगणेश आहेत. जसे कार्बन अणूमधील श्री गणेशाची रुपे स्वस्तिक व ओंकार आहेत, जेव्हा स्वस्तिक घड्याळाच्या काट्यांच्या दिशेने फिरते तेव्हा ते विधायक असते. जेव्हा ते घड्याळाच्या काट्यांच्या विरूध्द दिशेने फिरते तेव्हा ते विधायक ठरते. श्री माताजींनी सांगितले, पश्चिमेकडे मूलाधार, अनीतिमत्तेमुळे घड्याळाच्या काट्यांच्या विरूध्द दिशेने फिरत आहे.

श्री माताजी म्हणाल्या, पश्चिमेमध्ये सहजयोगाची अडचण ही आहे तेथील लोकांना त्यांनी नितीमान व्हावे असे सांगितलेले नको असते. या अनैतिकतेचा परिणाम म्हणजे एड्स् व इतर आजार आहे आणि यामुळे ते आता शिकत आहेत, परंतू ते आपण चुका केलेल्या आहेत हे देखील मानायला तयार नाहीत. तरीही, त्यांना वाचविले पाहिजे कारण ते साधक आहेत.

एखादयाने तुमच्यामध्ये आत्मा ठेवल्याने {अनुभव दिल्याने} लगेचच मिळणारा परमानंदाचा अनुभव म्हणजे सहजयोग नव्हे. त्यांची हळूहळूच प्रगती झाली पाहिजे. आपण निराश व्हायला नको, परंतू स्वतःला अधिक समाधानी ठेवा आणि विश्वास बाळगा. सहजयोगाला दमदार लोक हवे आहेत. असे संत देशाचे भाग्य उजळवितात. ध्यानामधून आणि सामुहिक चर्चा करून आपण गहनता प्राप्त केली पाहिजे. श्री माताजी म्हणाल्या वेगवान गोष्टी घडायला पाहिजेत. अडथळा

निर्माण करणारे लोक बाजूला टाकले जात आहेत. परंतू बाधेचा, निराशेच्या बाधेचा देखील आपल्यामध्ये शिरकाव व्हायला नको. थोडे जरी दर्जेदार लोक कार्यक्रमास आले, ते हजारो सहजयोग न स्विकारणा-या लोकांच्या अनुभवापेक्षा उपयोगी ठरतील. श्री माताजींनी, जास्त भक्कम गणेशशक्तिसाठी प्रार्थना करायला सांगितले. ही शक्ति सर्व बाधांचा निःपात करते.

श्री महाकाली पूजा, रॉन डिऑगो, 19 जून 1989

सर्वप्रकारे श्री महाकाली हे आदिशक्तिंचे प्रतिबिंब आहे. ती सर्व शक्तिमान परमेश्वराची इच्छा आहे. आपण सहजयोग्यांनी हे समजून घ्यायलाच पाहिजे की तिच्या शक्तिमुळेच आपण काहीही इच्छा करू शकतो. आपल्या उन्नीत आड येणा-या सर्व बाधांचा नाश झाला पाहिजे अशी आपण इच्छा धरली पाहिजे कारण आपल्या उन्नतिचे विधायक कार्य सुरु ठेवण्यासाठी श्री महाकालीने, जे दैवी रचना नष्ट करतील त्यांना नष्ट करण्याचे विघातक कार्य केलेच पाहिजे.

श्री माताजींनी सांगितले, प्रत्येक सकाळी होणा-या ध्यानामध्ये सहजयोग्यांनी श्री गणेशांचे नामस्मरण केले पाहिजे जी श्री महाकालींची शक्ति आहे आणि "माझी इच्छा काय आहे? हे माझे ध्येय आहे असे म्हणावे. ह्या सवयीमुळे शुध्द इच्छा सुधारण्यात आणि तीव्र होण्यासाठी मदत होईल. श्री माताजींनी हे देखिल नमूद केले की सहजयोगामध्ये शुध्द अंतःकरण नसलेले लोकही कार्य करू शकणार नाही कारण सहजयोग्यांमध्ये पुढील चार गुणधर्म असलेच पाहिजे.

| | |
|---|---|
| §1§ धीट व्हा. | §3§ बुध्दिमान व्हा. |
| §2§ तीव्र इच्छा बाळगा. | §4§ पवित्र रहा. |

श्री माताजींनी आपल्या इच्छांना लगाम लावण्यास सांगितले. सहजयोगी असल्याने आपण अधिक प्रेमळ बनतो. परंतू तरीही पश्चिमेकडे लोक आपल्या कुटुंबाकडे जास्त लक्ष पुरवित नाहीत ते फक्त स्वतःबद्दल आणि स्वतःच्या कुटुंबाबद्दल विचार करतात. हा स्वार्थीपणा आपले चित्त सौम्य बनविते व लोक अंतःकरणापासून त्यांची उन्नति करत नाहीत. ज्याप्रमाणे मुलांना धर्माकडून व देशाकडून निर्माण होणा-या प्रवृत्तीचा शिक्का बसतो परिणामतः भिन्न प्रवृत्ति असलेल्या लोकांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होत नाहीत या बद्दलही श्री माताजींनी सांगितले. आपणसुध्दा समाजाचाच किल्ला गिरवतो व त्यामुळे सुध्दा बंधने §प्रवृत्ति§ निर्माण होतात. या कृत्रिमपणाची प्रतिक्रिया म्हणून आपल्यामध्ये उन्नतिची शुध्द इच्छा उत्पन्न होते व अशा प्रकारच्या अटीतटींवर मात करता येते.

आत्मसक्षात्कारासाठी, आत्मा बनण्याआड येणा-या सर्व अडथळ्यांचा नाश करण्यासाठी प्रत्येकाने महाकाली शक्ती ही वाढविली पाहिजे, यावर श्रीमाताजींनी भर दिला. आपल्यामध्ये पटरिपु

असतात व श्री महाकाली आपल्या मार्गातील सर्व शत्रूंचा नाश करते, परंतू आपण त्यांनाच चिकटून न रहाण्याबद्दल खात्री केली पाहिजे. याचा रोख हाच की "आपल्याला ते मिळवायचे आहे व ती सर्व तुमच्यासाठी कार्यान्वित करत आहे." श्री महाकाली आपल्या शरिरास आल्यास आराम देते व नंतर आनंद देते. तरी, महाकाली शक्ती बळकट असलीच पाहिजे. म्हणून प्रथम मूलाधार देखिल बळकट पाहिजे. जेव्हा सहजयोग्याची इच्छाशक्ति व पाया भक्कम असेल तेव्हा आकाशातील पतंगाप्रमाणे इच्छा कार्य करते. जेथे काहीही आवश्यक नाही अशी आत्मानंदामधील निरिच्छपणाची अवस्था येईपर्यंत प्रत्येक इच्छा फलद्रुप होते.

## मातृदिनाच्या दिवशी आईचा संदेश

इंग्लंडमध्ये सहस्त्रार दिवस व श्री बुध्दपूजा या संपूर्ण आठवडयामध्ये श्रीमाताजींचे घर, संपूर्ण जगामधून आलेल्या हजारो फूलांनी भरून गेले होते व त्यांना मातृदिनाबद्दल शुभचिंतन देत होते. श्री माताजी म्हणाल्या, "पाश्चिमात्य जगात लोक आईची अजूनही आठवण ठेवतात व आभार मानतात. हा खूप मोठा आशिर्वाद आहे."

सर्व सहजयोग्यांनी पाठविलेली प्रेमळ पत्रे वाचताना त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. अनेक पत्र सहजयोग्यांच्या मुलांनी बनविलेली होती. श्री माताजी प्रत्येकाचे व्यक्तिशः आभार मानू इच्छित होत्या. परंतू वेळेअभावी त्या प्रत्येकाला उत्तर पाठवू शकल्या नाहीत. म्हणून ह्या लेखनाद्वारेच त्यांचे अंतःकरणापासूनचे आशिर्वाद पाठविलेले कार्ड, पत्र, भेटी व छायाचित्रे श्री माताजी, पुढील पिढयांसाठी आपल्या सुयोग्य व व्यक्तिगत संग्रही जपून ठेवत आहेत.

## श्री माताजींचा अमेरीका दौरा : भाग ।

जसा अमेरिका दौरा सुरू झाला तसे अमेरिकेने सहजयोगाच्या नव्या पातळीवर प्रवेश केला. न्यूयॉर्कमधील श्री विराट पूजेच्या सुरवातीपासूनच श्री माताजींनी सर्व पातळीवर उत्साही सह-भागाची लहर पसरविली. आत्मसाक्षात्काराची वाट पहाणा-या साधकांमध्ये जॉ मेट्रीक त-हेने वाढ झाली. सिनसिनाटी मध्ये 150 टोरॉंटोमध्ये 400 व्हॅंकुव्हर मध्ये 800 व सॅनडिऍगोमध्ये 1600 लोक होते. मायामी या आपल्या नव्या केंद्रातही 150 लोकांचा भरगोस पाठिंबा मिळाला. §UNO§ युनायटेड नेशन्समधलेही 30 राजनैतिक मुत्सद्दी उपस्थित होते.

श्री विराटपूजेचा परिणाम लगेचच स्पष्ट झाला, जेव्हा 4 जुलैला §अमेरिकेचा 213 वा स्वातंत्र्य दिन§ वर्तमानपत्रात बातमी आली की, श्री माताजींच्या दौ-यामध्ये, शनी ग्रहाची दुर्मिळ

छायाचित्रे घेण्यात आली होती. ज्यांच्यामध्ये शनी ग्रहाची कडी स्पष्टपणे दिसत होती. ही पहिलीच वेळ होती की, पृथ्वीवरून विशुध्दीचा ग्रह व त्याच्याबरोबर स्पष्टपणे दिसणारे सुदर्शन चक्र छायाचित्रात केले गेले होते.

श्री माताजी विशेष प्रसन्न होत्या कारण ही केवळ प्रथमच वेळ नव्हती, जेव्हा या देशाने इतक्या चांगल्या रितीने प्रतिसाद दिला होता तर सर्वयोगी नविन ग्रहनतेच्या युगात शिरत होते व त्यांचा उद्देश समजून घेतला होता. अमेरिका हे आता एकसंघ राष्ट्र आहे व ते आपल्याच घरामागील अंगणामध्ये काय आहे याचे ओझरते दर्शन घेण्यासाठी डोके वर काढत आहे आणि सहज-योगाच्या आंतरराष्ट्रीय प्रगतीमध्ये सहभागी होण्याची तयारी करत आहे.

श्री माताजींनी आपल्याला आत्मविश्वासी व निर्भय होण्याचा संदेश दिला आहे व सत्यशोधकांपाशी पोहचून त्यांचे शब्द पोहचविण्यास सांगितले आहे. आपण प्रत्येकाने गहनता वाढविण्यासाठी रोज ध्यान केलेच पाहिजे व सहजयोगाला प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. सर्व जगाला संधी उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे आणि त्याचे सुपरिणम श्री माताजींच्या चरणी अर्पण केले पाहिजेत. श्री माताजी गेली सोळा वर्षे इंग्लंड मध्ये आहेत व सर्व केंद्राच्या अहवालांनुसार हे स्पष्ट झाले आहे की ही विशुध्दीने स्वतःच प्रगट व्हायची ही वेळ आहे.

## श्री विराट पूजा व चर्चासत्र

अनेक आठवडयांच्या तयारीनंतर व श्री माताजींच्या अमेरीकेच्या दौ-याआधी या कार्यक्रमासाठी श्री विराट पूजेसाटी अमेरिकेमधून कॅनडामधून व परदेशातूनन 150 योगी बॉनटम कनेक्टीकट येथे जमले. आमच्यापैकी अनेकांच्या आठवडयाचा शेवट न्यूयार्कला जाण्यासाठी झालेल्या मुसळधार पावसाच्या प्रवासाने झाला. या जोरात वादळातही श्री माताजी केनडी विमानतळावर आल्या व त्यांचे स्वागत उल्हसित सहजयोग्यांच्या झुंडीने झाले. सर्व सहजयोग्यांनी श्री माताजींचे स्वागत फूलांच्या भेटी देऊन केले व क्षणात विमान-तळावरील माळ्याची सर्व फूले विकली गेली. श्री माताजींनी जवळच असलेल्या न्यूयॉर्क आश्रमामध्ये विश्रांती घेतली व इतर योगी एक दीड तासाच्या रस्त्यावर असलेले कनेक्टीकट येथे तळ्याकाठी उभारलेल्या जागेच्या ठिकाणी गेले. प्रत्येकजण रात्रभर उत्साहात अत्यानंदामध्ये मग्न होता व चिंब भिजविणारा पाऊस पडत होता व तो दुस-या दिवशीच्या पूजेसाठी साफसूफ करण्यासाठी श्री माताजींनी पाठविला होता.

श्री माताजींच्या अपेक्षित आगमनाच्या सर्व योग्यांनी मैळाव्याच्या रस्त्यावर रांग केली व सूर्याने आम्हाला शुभेच्छा दिल्या. तळ्याकाठी श्री माताजींच्यासाठी तयार केलेल्या घराकडे जाताना सर्व

उल्हसित झालेले योगी, गाडीबरोबर आणि श्री माताजींच्या गाडीसमोर नाचत गात निघाले. मिरवणुकीच्या अग्रभागी वाद्यवृंदाने भरलेली व्हॅन होती. अमेरिकेमध्ये अशी पहिलीच मिरवणूक होती. श्री माताजी आगमनानंतर थोड्याच वेळात उत्तर अमेरिकेमधील नेत्यांना (सहजयोगी) भेटल्या. श्री माताजींनी निदर्शनास आणून दिले कि नविन सहजयोग्यांची कमतरता म्हणजे आपल्या गहनतेमध्ये असलेल्या आपल्या स्वतःच्या कमतरतेचे प्रतिबिंब होय. श्री माताजींनी आम्हाला नाराज न होण्यास सांगितले कारण श्री माताजी स्वतः चित्रकार आहेत व आपण रंगाचे कुंचले आहोत व या सर्व नाटकाचे उपकरणे आहोत. रंगाचे कुंचले वाईट का बरे वाटून घेतील? आम्हाला सर्वांना आपल्यामध्येच गहनतेत जाण्यासाठी उत्साही केले गेले. त्यामुळे साधक, सामुहिकतेमध्ये कुंडलिनीची गहनता जाणू शकेल व अशाने आपल्यामधील देवाचे अस्तित्व समजू शकेल.

सर्व योग्यांनी श्री माताजींच्या घरापुढे ध्यान केले व डावी उजवी बाजू साफ करण्याकडे भर दिला. उरलेली दुपार, अनौपचारिक भेटीसाठी व पूजेच्या तयारीसाठी हवन करण्यासाठी व्यतित केली. अमेरिकन स्त्रियांनी हाताने बनविलेल्या कागदी फुलांनी हॉल सजविला व त्यामध्ये संध्याकाळी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम साजरे केले गेले. न्यूयार्क व बोस्टन येथील सहजयोग्यांनी संगीताच्या साथीवर अमेरीकन भारतीय गद्य व काव्य प्रस्तुत केले. सर्व जगभर स्थानिक लोक कुंडलिनीबद्दल कसे जाणून आहेत व निष्पाप अमेरीकन इंडीयन लोकांची गो-या माणसाकडून कशी हत्या केली गेली यावर श्री माताजी बोलल्या. या योजनेच्या शेवटात असतानाच आम्हाला असे आढळले की एकेकाळी अमेरिकन भाषेमधील चॅटम म्हणजे "प्रार्थनेचे स्थान" या नावाची जागा तेथे अस्तित्वात होती.

या कार्यक्रमापाठोपाठ न्यूयार्कच्या मुलांनी उत्क्रांतीबद्दल नविन नाच सादर केला व त्यानंतर टोरोंटो येथील दोन तरुण योगिनींनी व त्यांच्या नाचाच्या शिक्षिकेनी भारतीय पवित्र नृत्ये प्रस्तुत केली. व्हॅंकुव्हर येथील व्हर्न विलीस यांनी संगिताच्या ऑडियो व व्हिडिवो टेप्स दाखविल्या व भक्ति संगीताचा आधुनिक प्रकार दाखवला. श्री माताजींनी ठासून सांगितले की, चालू प्रसिध्द रॉक संगीत हे सहजयोगाबद्दल माहिती घेण्यास सर्व साधकांना उपयोगी होऊ शकते. श्री माताजींनी हे सुध्दा दर्शवून दिले की, अमेरिकेमध्ये सहजयोगासाठी संगिताची महत्वाची भूमिका असली पाहिजे. शांत व प्रसन्नपणे सॅन डियागोच्या योगिनींनी नृत्याचा कार्यक्रम करुन व शेवटी प्रत्येक नृत्यकाराने श्री माताजींच्या चरणांवर फुल अर्पण करुन कार्यक्रमाची सांगता केली.

अनेक भजनांमध्ये संध्याकाळ उलटून गेली व त्यानंतर श्री माताजींनी सांगितले की त्यांना पृथ्वीमधून खूप खोलीवरुन येणा-या चैतन्यलहरी जाणवल्या.

पूजेच्या सकाळी कॅम्पमधून वाहाणा-या प्रचंड सोसाट्याच्या वा-याने आम्हाला जाग आली.

त्यानंतर श्री विराट पूजा होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. पूजेच्या भाषणामध्ये श्री माताजींनी ही पूजा अमेरिकेच्या मेंदू असलेल्या प्रश्नांवर कशी उपयोगी पडेल याबद्दल सांगितले. त्यांनी, सध्या अमेरिका गुंतलेली आणि डावीकडे आहे. तिची इंग्लंडशी तुलना केली गेली. हे अतिशय जरुरीचे आहे की ठोस कृती करुन परत मध्यात आले पाहिजे हे अतिशय प्रभावी भाषण होते या अंकात दुसरीकडे ते संक्षिप्त रुपात सामावलेले आहे. श्री माताजींनी प्रत्येक सहजयोग्याकडे ह्या कॅसेटची प्रत असायला व ऐकायला सांगितले आहे. ज्या अमेरिकन इंडीयन्सची निष्काळजीपणे व निघृणपणे कत्तल करण्यात आली. त्यावरचा डाव्या बाजूचा प्रभाव काढून टाकण्यासाठी। 08 अमेरिकन इंडीयन जमातींची नांवे वाचण्यात आली पूजेच्या शेवटी हाताने बनवलेला चिरुक जमातीचे शिरस्त्राण श्री माताजींना भेट देण्यात आला. असें सांगण्यात येते कि इंडियन्सबाबत जे घडले त्याबद्दल श्री माताजींना खूप वाईट वाटते व दुःख झाले की जे टाळवता येणार नाही.

या महत्वपूर्ण पूजेनंतर, श्री माताजींना अनेक भेटी अर्पण करण्यात आल्या. त्यामध्ये ॲरिझोना टारकॉइजचा (नीलमण्यांचा) गळयातील हार आणि अब्राहम लिंकनचे तैलचित्र यांचा समावेश होता. स्थानिक सहजयोग्यांनी तयार केलेली अनेक तैलचित्रेसुध्दा दिली होती. श्री माताजींनी सुंदर भेटवस्तूंचा व फुलाच्या तैलचित्रांच्या भेटीचा आमच्यावर वर्षाव केला.

न्यूयॉर्क :

न्यूयॉर्क शहराकडे आता लक्ष परत वळले व सर्व सहजयोगी त्यांच्या घरी जाहीर कार्यक्रमांच्या तयारीसाठी परतले. न्यूयॉर्कमध्ये दोन सभा घेतल्या गेल्या व बरोबर साधारणतः 50 साधक आले होते. पहिली सभा अवघड होती परंतू दुस-या सभेमधून अनेक दर्जेदार साधक, चांगल्या चैतन्यलहरी असलेले मिळाले.

जरी ही घटना निरुत्साही करणारी होती तरीही, जाहीर प्रचार करण्याची नविन पध्दत स्विकारण्याची चेतना न्यूयार्कच्या सामुहिकतेमध्ये आली. श्री माताजी म्हणाल्या की न्यूयार्कमध्ये मोठी भित्तीपत्रे जास्त परिणामकारक ठरत नाही म्हणून दुसरे मार्ग अवलंबिले पाहिजे. न्यूयॉर्कमध्ये दर रात्री 300 पेक्षा जास्त कार्यक्रम असतात, म्हणून असे ठरवले गेले की नविन प्रचार पध्दतीसाठी धंदेवाईक सल्लागाराची मदत घेतली पाहिजे. श्री माताजींनी न्यूयार्क ही अतिशय खडतर जागा असल्याचे सांगितले व ही जागा अशी आहे की जेथे सहजयोगाची जास्तीत जास्त आवश्यकता असल्याचे सांगितले परंतू तेथील लोक आत्म्याबद्दल अनभिज्ञ आहेत.

आठवडयाच्या शेवटी श्री माताजी विमानतळावर थांबल्या असताना आश्चर्यकारक अनौपचारिक चर्चा झाली. गर्दी असलेल्या विमानतळावर जेव्हा सर्व सहजयोगी श्री माताजींच्या आजूबाजूस बसले तेव्हा श्री माताजींनी तेथे हजर असलेल्या प्रत्येक सहजयोग्याला भवितव्य व स्थितीमधील बदल सुचविले. श्री माताजींनी उरलेला दौरा सुरु ठेवला. आमच्यापैकी काहींना माहिती होते की श्री माताजींचे सिनसीनाटी, टोरोंटो, व्हॅंकुव्हर, सॅनडिॲगो किंवा नियामी येथे दर्शन होईल. श्री माताजींची जुलैच्या सुरवातीस युनायटेड नेशन्स येथे होणारी विशेष घरगुती बैठक असल्याने त्या परत येण्याच्या न्युयॉर्कवासियांच्या अपेक्षा होत्या.

सिनसिनाटी :

आपल्या परमपूज्य आईने पूर्वीपासून ठरविलेली येथील भेट येथल्या सर्व सहजयोग्यांना लाभली. श्री माताजी 14 जूनच्या दुपारआधी सिनसिनाटी येथे आल्या व त्यांचे प्रफुल्लीत योगींनी, योगीनींनी व अनेक फुलांनी स्वागत झाले. आम्ही सर्व आश्रमात वेळेवर आलो व शंखनादाने आरतीने त्यांचे स्वागत केले आणि जेव्हा त्यांनी घरात प्रवेश केला तेव्हा त्यांना हार अर्पण करण्यात आले. श्री माताजींनी आश्रमाच्या शांततेबद्दल गौरवोद्गार काढले व त्यांना त्यांच्या लंडनमधील पहिल्या घराची आठवण झाल्याचे सांगितले.

जेवण घेण्याअगोदर श्री माताजी आमच्याबरोबर बसल्या व न्युयार्कच्या कार्यक्रमाबद्दल सांगितले. श्री माताजींनी यावेळी नमूद केले की, त्यांना असे वाटते की सिनसिनाटी येथे खूपच चांगले कार्य घडेल.

जेवणानंतर श्री माताजी त्यांच्या खोलीमध्ये विश्रांती घेण्यास गेल्या व ओहीओचे योगी, बोस्टनहून आलेले, मेन व न्यूयॉर्क येथून आलेले योगी खालच्या भागाकडे सिनसिनाटीच्या इडनपार्क मधील सिसनगुड पॅव्हेलियन या सुंदर मोकळया सभागृहाकडे निघाले व तेथे संध्याकाळच्या कार्यक्रमा-साठी मंचबांधणी सुरु केली. मंचबांधणीची पध्दत ही व्यवस्थित व सामुहिक होती. प्रत्येक माणसाने थोडा थोडा हातभार लावला व त्याचा अंतिम परिणाम प्रत्येकालाच आनंदीत करणारा ठरला. दिवसभर पावसाची रिमझिम चालूच होती व अनेक साधकांनी पर्यायी बैठक व्यवस्थेची चौकशी केली. पाऊस पडणार नाही याची प्रत्येकाला खात्री देण्यात आली आणि सांगायची आवश्यकताच नाही की श्री माताजींच्या आगमनासाठीच संपूर्ण हवामान स्वच्छ झाले.

श्री माताजी कार्यक्रमास साधारणतः 8 वाजता आल्या. श्री माताजींनी अंदाजे 200 दोनशे साधकांच्या सभेला अतिशय सरळ व सोप्या भाषेत सत्याच्या परिपूर्ण स्वरूपाबद्दल नव्या

जाणिवेच्या आवश्यकतेबद्दल व आपली जाणिव सुबुध्दी सुधारण्यासाठी देवाने दिलेल्या ह्या संधीबद्दल, सांगितले. श्री माताजींनी आपल्या मुळांची {रूटस्‌ची} माहीती असण्याचे महत्व, संत होणे, साक्षी होणे, आत्मा होणे म्हणजे काय ते सुध्दा सांगतले. श्री माताजींनी प्रेक्षकांचा त्यांच्यात जागृत झालेल्या नविन जाणिवेच्या प्रगतीची जबाबदारी घेण्यात उत्साह वाढविला.

जेव्हा श्री माताजींनी प्रश्न विचारण्यास सांगितले तेव्हा चार माणसांनी प्रश्न विचारले. प्रत्येकाचेच गहन व महत्वाचे असे प्रश्न होते, इतिहासात ही वेळ का महत्वाची आहे, मानवाच्या व स्वतःच्या या मोहरलेल्या वेळेचा काय परिणाम होणार आहे. कुंडलिनीचे जेव्हा उदयापन होते, तेव्हा कर्म कशी दूर होतात, मुले ज्या शुध्दतेबरोबर व गहनतेबरोबर जन्माला आली त्यांचा -हास होण्यापासून मुलांना कसे दूर ठेवावे.

श्रोतृवर्ग मंचापासून थोडा दूरवर बसला होता व अनेक माणसे आवश्यकतेपेक्षा खूपच मागे बसली होती. म्हणून जागृती देण्याआधी श्री माताजींनी त्यांना थोडे पुढे येण्यास सांगितले. अचानक ज्याप्रमाणे सामुहिक इच्छेची लाट उसळावी तशी पूर्ण श्रोतृवर्ग उठून उभा राहिला व मंचाच्या अगदी समोर जमिनीवर बसला. ह्या हालचाली अतिशय वेगाने घडल्या व श्री माताजी स्वतः म्हणाल्या, "अरे व्वा!! बघा, सर्वजण येथे खाली आले आहेत ! हेच ते सिनसिनाटी! खरोखर अद्भूत नाही का? श्रीमाताजींनी साधकांच्या अधिक जवळ जाण्यासाठी त्यांचे आसन मंचाच्या टोकाला घ्यायला सांगितले. श्री माताजींनी आश्चर्योद्गार काढले, "काय ही उत्सुकता ! किती सुंदर लोक!

जागृती दिल्यानंतर श्री माताजींनी दाखवून दिले की कुठलेही झाड अथवा पान हलत नव्हते व थोडाही वारा वहात नव्हता व जे आपण अनुभवत होती त्या थंड लहरी होत्या. आजूबाजूची स्तब्धता खरोखर परीपूर्ण होती. प्रत्येक गोष्ट अचल वाटत होती. जेव्हा श्री माताजींनी, कुणाकुणाला चैतन्य लहरी जाणवल्या, असे विचारताच अनेक हात वर झाले. त्यावर श्री माताजींनी आश्चर्योद्गार काढले व म्हणाल्या, "वा ! देव तुम्हाला आशिर्वादीत करो! सिनसिनाटी काय जागा आहे! इतके साधक !! मी खरोखर तुम्हाला नमस्कार करते ...... फार ! फार !!"

कार्यक्रमाच्या शेवटी साधक श्री माताजींना भेटण्यासाठी मंचावर आले. त्यांच्यापैकी काही मुले होती व त्यांनी श्री माताजींना ओळखले असावे. उत्तर करोरिना मधून {डी इ सी गणक कंपनीमधून} दोन शास्त्रज्ञ आले होते. त्यांच्या, माणसांनी निरनिराळ्या जागृत अवस्थांमध्ये असताना मेंदूमधून उत्सर्जित केल्या जाणा-या लहरीबद्दल करण्यात येणा-या संशोधनाबाबत, श्रीमाताजी त्यांच्याशी बोलल्या. "सहज जाणिवे"बद्दल संशोधन करण्यामध्ये त्यांना रस वाटला व उत्तर कॅरोलीना

मध्ये त्यांचा याबद्दल कार्यक्रम करण्याचा विचार आहे. जेव्हा श्री माताजी आश्रमात परतल्या तेव्हा त्यांनी झालेल्या कार्यक्रमाबद्दल व लोकांबद्दल आपण खूप समाधानी असल्याचे सांगितले.

दुस-या दिवशी सकाळी आम्ही सर्व श्रीमाताजींना निरोप देण्यासाठी विमानतळावर गेलो. तेथे श्री माताजींबरोबर जवळजवळ एक तास बसण्याचे आम्हाला भाग्य लाभले. (आकस्मिक विमानाच्या उड्डाणाला वेळ लागल्याने) या वेळेमध्ये श्री माताजींनी प्रत्येकाच्या प्रश्नांची उत्तरे दिली. श्री माताजी म्हणाल्या की लहान शहरे ही सहजयोग पसरविण्याच्या दृष्टीने सोपी आहेत व त्यांनी काही सहजयोग्यांना क्लेव्हलँड, टिकीन व ओहीओ (जेथे श्री माताजींनी खूप वर्षापूर्वी भेट दिली होती) येथे बैठकी भरवण्यास सांगितले. आम्हाला श्री माताजींना निरोप देताना वाईट वाटले परंतू आदल्या रात्री झालेल्या कार्यक्रमाने खूपच उल्हसित वाटत होते. श्री माताजींच्या आशिर्वादांनी, खालील शिलालेखा वर इच्छा व्यक्त केली गेली होती. (सिसनगुड पॅन्हेलियनच्या भिंतीवर) व ती पूर्ण होण्यास सुरवात झाली.

## टोरॅंटो

टोरॅंटो मध्येच सन 1983 ला श्री माताजींनी स्वतः परमेश्वराचे अवतरण असल्याचे सांगितले होते. श्री माताजी म्हणाल्या यावर्षी जाहिर कार्यक्रम इतके यशस्वी होण्याचे हेच कारण होय. श्री माताजींच्या आगमनापूर्वी आठवडयांचे काम तीन दिवसात आटोपून त्यांनी खरोखर वेळ, अंतराळ व उर्जा या तिन्हींवर प्रभुत्व सिध्द केले. व्हर्न, लोरी पवन आणि डेबोरा यांच्या कसतशीर पद्धतीने टोरॅंटोच्या सामुहिकतेने श्री माताजींच्या रहाण्याची, टोरॅंटोमधील सर्वात चांगल्या रॉयल यॉर्क" या हॉटेलमधील नव्यानेच बांधण्यात आलेल्या कक्षामध्ये सोय केली. या आराम कक्षाची निवड म्हणजे खरोखर अव्यक्त ही व्यक्त होण्याची. गोष्ट (पाळी) होती. जेव्हा इतर हॉटेलांचा उल्लेख करता करता क्रियमने तिस-यांदा अनवधानाने रॉयल यॉर्कचा उल्लेख केला तेव्हा पवनने त्याला रॉयल यॉर्कचाच उल्लेख का केला असे विचारले. जेव्हा आरक्षण व्यवस्थापकाला आम्ही भेटावयास गेला, तो अतिशय सहकार्याने वागला व आम्हाला आराम कक्ष दोन रात्रींसाठी फक्त एका रात्रीच्या दराने मिळाला. त्यामुळे आम्हाला श्री माताजींच्या खोलीची नीटपणे व्यवस्था करायला भरपूर वेळ मिळाला. मध्यंतरी, स्त्रियांनी कापड, चिनीमातीची भांडी, चहाची भांडी इ.ची खरेदी केली व प्रत्येक गोष्ट अगदी योग्य दरात मिळाली. श्री माताजींना बिछान्यावरची चादर व हाताने बनविलेले कॅनेडियन लेसचे कव्हर खूपच आवडले.

व्हर्न व रॉबर्टने रस्त्यांवर टोरॅंटोवासियांना पत्रके व जाहिराती वाटल्या. श्री हनुमानांची

अमर्याद शक्ती व विनोद बुध्दीने सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळाल्याची खात्री झाली. श्री माताजींच्या आगमनानंतर थोड्याच वेळात स्थानिक आकाशवाणी केंद्राकडून एक स्त्री आली. तिची ठरविलेली अर्धा तासाची मुलाखत जवळपास दोन तास चालली व त्याची परिणीती तिच्या स्वतःला आत्मसाक्षात्कार प्राप्त होण्यात झाली. तीने या आधीच कोलंबियामधील मादक पदार्थाचा व्यापार अणुशक्तीचा -हास यांबद्दल नुकतेच लिखाण पूर्ण केले होते व तिची काही इंडीयन चीफ बरोबर बैठक झाली होती व त्यांचे विचार तिला सहजयोगाच्या विचारांशी तंतोतंत जुळणारे वाटले. सत्ता व पैसा असण-असणा-या थोड्या व्यक्तिंनी मानवजातीवर लादलेले एकॉलॉजीचे प्रश्न सामान्य मानवाच्या जीवनात कसे वादळ उठवू शकतात. या कडे तिच्या मुलाखतीचा कल होता. सहजयोगाने हे कसे टाळले जाईल व हा प्रश्न सुटण्यास कशी मदत होईल याबद्दल त्यांची चर्चा झाली. मानवतेबद्दल खुप काही अपेक्षा करून तिने मुलाखत संपविली आणि आपल्या ह्या लोकांचे आयुष्य अधिक सुकर बनविणा--या चळवळीस सर्वतोपरी पाठिंबा दण्यासाठी व लिहिण्यासाठी तीन जास्तीत जास्त प्रयत्न करण्याचे ठरविले.

या सर्वांचा परिणाम म्हणन 400 लोकांचा यशस्वी जाहिर कार्यक्रम झाला व त्यांच्या पैकी अनेक गहनतेतील साधकांनी श्री माताजी निर्मलादेवींना आळखले. प्रत्येकाशी खजगी भेट घेऊन सल्लामसलत करून, श्री माताजी रात्री 1 पर्यन्त मंचावर होत्या. दुस-या दिवशी विमानतळावर खुप मोठया सहजयोगी समुदायाने श्री माताजींबरोबर अर्धा तास सान्निध्याचा आनंद लुटला. विजयोत्सवासारखा आनंद व मनःशांती निःसंशयपणे आपल्या आईला होणा-या आनंदाचे आणि त्यांच्या पुढील वर्षी पुन्हा येण्याच्या आश्वासनाचे प्रतिबिंब होते. निघण्याआधी श्री माताजी म्हणाल्या "ब्रम्हचैतन्याबद्दल बोलत असताना तुम्हा सर्वांना एवढेच करावयाचे की तुम्हा सर्वांना त्याच्याशी एकरूप झाले पाहिजे.

**व्हँकुव्हर**

16 जुन शुक्रवारच्या दुपारी श्री माताजींनी व्हँकुव्हर, कॅनडाच्या सौंदर्याला शोभा आणली. आम्ही श्री माताजींच्या आरामकक्षातील गुलाबाची फुले घेऊन टोरोंटोहुन फक्त वीस मिनीटे आधी येऊन पोहोचलो होतो व योगी विमानतळावरून इकडे तिकडे जा- ये करत होते. श्री माताजींची सहा वर्षांमधील ही पहिली भेट, व्हँकुव्हरच्या सामुहिकतेचे स्वप्न होते. श्रीमाताजींच्या भेटीच्या तयारीसाठी ज्या प्रेमाने आश्रमामध्ये काम झाले होते, ते पाहुन त्यांना खुप आनंद झाला. श्री माताजींनी सांगितले की त्यांना त्याच्या खोलीमध्ये पसरलेले प्रेम पाहून पहिल्या दुपारी खुप सुंदर विश्रांती मिळाली. श्री माताजी विश्रांती घेत असताना डॉ. ब्रायन वेल्स हे इंग्लंडहुन आले.

पहिल्या संध्याकाळी श्री माताजींनी त्यांचे जेवण आमच्या बरोबर घेतले व आईनस्टाईन जो आत्मघातकी व पाश्चिमात्य अहंकाराचा उच्चांक होता. त्यांच्याबद्दल हास्यविनोद केले. तसेच पी.एच.डी. व एम.ए.डी. होते. त्यांच्याबद्दल ही हास्यविनोद झाले. [भक्ति, शिस्त व बांधिलकी सहजयोगाचे गुणधर्म आहेत असे श्री माताजींनी सांगितले. जेव्हा आपणच हे गुणधर्म बनतो तेव्हा सर्व देवता आपल्याशी बांधलेल्या व आपल्यासाठी अर्पित असतात.]

आईचे प्रेम व दया आपल्याला प्रत्येक परिस्थितीत आशिर्वादीत करत असतात. प्रत्येकाची श्रीमाताजींशी ओळख करून देण्यात आली. येणा-या जाहिर कार्यक्रमांबाबत चर्चा झाली व मध्यरात्री आम्हाला सर्वांना स्वर्गातच झोप लागली.

शनिवारी सकाळी ठरलेली महाकाली पूजा लवकर सुरू झाली. श्री माताजी म्हणाल्या, "आपली इच्छा व गहनता हे सहजयोग व्यक्त करणारे गुण आहेत. संगीत व व्हिडियो सुध्दा किती प्रभावी होऊन उत्तर अमेरीकेवर कार्य करू शकतात. पुरूषांनी श्री माताजींची पूजा केली. ही संक्षीप्त व प्रभावी क्रिया होती जी सहजयोगाने आत्मसात केली पाहिजे यावर श्री माताजींनी भर दिला. श्री महाकालींनी आम्ही त्यांचे पवित्र नमोच्चार करत असतानाच हसत खेळत डाव्या बाजूवरील बाधांचा नाश केला.

पूजेनंतर लगेचच, संगीत संस्थेमध्ये घेतलेल्या जाहिर सभेकडे लक्ष वेधले गेले. डॉ.ब्रायन केल्सनी जेमतेम उभे रहाण्यापुरती जागेत असलेल्या श्रोत्यांना वस्तूचा दुरूपयोग व बदलल्या आयुष्य-प्रणाली कॅनेडीयन साधकांमध्ये आणत असलेला अडथळा यांवर भाषण दिले. डॉ.केल्स हे धडाडीचे, धंदेवाईक, विनोदबुध्दीचे होते व त्यांनी नकळतच सर्व श्रोतृवर्गाला श्री माताजींच्या शाही आगमनासाठी नेले.

श्री माताजींनी उभे असलेल्या साधकांना उपदेश केला. मायेमुळे अहंकार खाली उतरवून विचार करण्याऐवजी ऐकण्याकडे लक्ष केंद्रित केले गेले. श्री माताजींच्या सुंदर, अमर्याद अशा प्रेमाने अटीतटी, बंधनाच्या मोठमोठया पर्वतांना देखील वितळवून टाकले व 500 लोकांना आत्मसाक्षात्काराचा लाभ झाला. श्री माताजींनी प्रत्येकावर कित्येक तास कष्ट घेतले व साधकांच्या दर्जाबद्दल समाधानी झाल्या.

रविवारी सकाळी सर्वजण लवाजम्यासह श्री माताजींबरोबर विमानतळावर गेलो. तेथे आल्यावर आमच्या लक्षात आले की श्रीमाताजींची एक पेटी हरवली आहे. आम्ही दीड तासाची फेरी फक्त 45 मिनिटांमध्येच पूर्ण केली. तरीही, विमानतळावर गाडी उभी करत असताना पोलिसांनी आम्हाला शेवटी पकडलेच. "आमची आई युनायटेड नेशन्सला जात आहे व हे सर्व

महत्वाची कागदपत्रे घ्यायची आहेत" असे थोडे स्पष्टीकरण दिल्यावर त्यांचे लक्ष श्री माताजींच्या बिल्ल्यावर वेधले गेले. ते थोडेसे नरम झाले व आम्हाला तीन लाल सिग्नल मोडून 100 च्यावर वेगाने गाडी चालवण्याबद्दल ताकीद देऊन आश्चर्यकारकरित्या सोडून दिले. जय श्रीगणेश !. जय श्री हनुमान !. श्री माताजी आमच्याकडे सावकाश चालत आल्या व जेव्हा त्यांच्या या मायेबद्दल सांगितले तेव्हा त्यांना हसायला आले.

श्री माताजींनी शेवटी पुन्हा सांगितले, "ध्यानाच्या गहनतेत उतरा व सामुहिकतेमध्ये या." श्री माताजींचे विमान सरताच आम्ही आमच्या गाडीमध्ये उडया टाकल्या व या अविश्वसनीय देण्याला सॅनडिअॅगोच्या दिशेने कोडग्याप्रमाणे 100 च्या वेगाने निघालो. अमेरिकेवर आशिर्वादांचा वर्षाव झाला.

सॅनडिअॅगो

जून 18 "फादर्स डे" च्या दिवशी श्री माताजी सॅन डिअॅगोमध्ये आल्या. त्याचदिवशी संध्याकाळी सार्वजनिक कार्यक्रम एका ओपन एअर सभागृहामध्ये ऑर्गन पॅव्हीलीयन शहरांतील मुख्य बागेमध्ये आयोजित केला होता. स्तब्ध संध्याकाळच्या हवेत थोडया वाद्य संगीत आणि श्री माताजींच्या छोट्या भाषणानंतर सातशे लोकांना दैवी थंड वारा जाणवला. श्री माताजींचे भाषण सत्य शोधण्याची साधकाची गुणवत्ता व मूर्खासारखे धावत जाऊन नाश न करून घेण्याची प्रवृत्ति याकडे केंद्रीत झाले होते. दुस-या दिवशी सकाळी श्री माताजींची श्री महाकाली-राक्षस मर्दिनीच्या स्वरूपात पूजा करण्याचे भाग्य आम्हाला लाभले. आपल्या अधांग करूणेमध्ये ही पूजा काळजीपूर्वक आणि उत्कटतेने करायला सांगितली होती. यामुळे श्री माताजी करणार असलेल्या आश्चर्यजनक कार्याची आम्हाला तीव्रतेने जाणीव झाली.

श्री गणेशांच्या पूजेने पूजेची सुरवात झाली. श्री गणेश जे महाकालीचे पुत्र व इडा नाडीचा आरंभ होत. पूजेच्या वेळी श्री महाकालीच्या नावाचे मंत्राच्चारण झाले. श्री माताजी काही वेळा स्मितहास्य करीत होत्या. काहीवेळा हसत होत्या. श्री महाकाली म्हणजे मूर्तीमंत आनंद आणि क्रियामंत्राचा भास दिसला.

प्रथम सर्व पुरूषांनी श्री माताजींचे चरण धुतले {प्रत्येकाने दोनदा} मग सर्व स्त्रीयांनी ओटी भरली. काही गंमतीदार घटनेने श्रीमाताजींना सोन्याच्या दागिन्यांचे दोन सेटस् दिले गेले आणि त्यांनी ते दोन्ही एका वेळी घातले. त्यांचे पैंजण सोन्याच्या झालरीसारखे दिसत होते. शिरस्त्राणा-सारखा मुकुट घालत असताना त्यांनी आम्हाला "हे आदि माँ" हे गीत म्हणायला सांगितले. राक्षसांच्या

शिरांची माला धारण करून आजूबाजूला ठेवलेल्या शस्त्रातील काही शस्त्र उचलून त्यांनी आम्हाला चकीत केले. शंख, चक्र, गदा, तलवार, अंकूश, पाश, कु-हाड, भाला, त्रिशूळ, धनुष्यबाण अशी अनेक शस्त्रे त्यांच्या चरणापाशी होती. कदाचित अनुच्चारित प्रार्थनेला उत्तर म्हणून त्या म्हणाल्या "माझे सर्व हात मी वापरू का? शस्त्रे हातात घेऊन त्याचे डोळे एक जागी स्थिर व लाल झाले आणि कसेबसे आम्ही त्यांचे दर्शन घेऊ शकलो. ज्याचे आपल्या स्तुत्य मालकावर पूर्ण लक्ष आहे असा छोटा प्राणी त्याच्या आकलनापलिकडे असलेल्या गोष्टीवर मालक रागवतो तेव्हा जसे वाटेल तसे वाटले.

पूजेच्या शेवटी सर्व बाधा व सर्व बाधीत लोकांचा नाश व्हावा अशी प्रार्थना करावयाला सांगितली. अमेरीकेची डावी बाजू शेवटी एकदा स्वच्छ धुतली जाणार ही खूप मोठी मदत होती. आरती झाल्यावर आम्ही वंदन करण्यासाठी वाकलो त्यावेळी श्री माताजी "इच्छा, इच्छा" इतक्या उत्कटतेने म्हणाल्या की शुध्द इच्छा शक्ति जास्त खोलात प्रतिबिंबीत झाली.

पूजा झाल्यावर श्री माताजींनी कार्यक्रमाच्या यशासाठी हृदयापासून काम करण्याचे महत्व सांगितले. तसेच सहजयोगाच्या कार्याचेही आदल्या दिवशी संध्याकाळच्या कार्यक्रमाची जाहिरात फार छान झाली होती. प्रयत्नही पूर्ण उत्साहाने झाले होते हे सांगितले. अमेरीकेत वाढ होण्यासाठी करावयाचे बदल आणि मार्ग सांगितले.

विलीस हा कॅनडाचा नवा नेता. करण खुराना अमेरीकेचा नवा लिडर होईल. डेव्हीड डनफ्रेने सॅन डियागोकडे पहावं. कॅरोलीन व्हान्सने न्यूयॉर्क, जॉन डी कॉकर बोस्टनकडे लॉस ॲंजेलीस आणि सॅन फ्रॅन्सिस्को हे दोन भाग आता प्रगत होतील.

श्री माताजी असेही म्हणाल्या की जातियवाद हा पश्चिमेचा सर्वात वाईट प्रश्न आहे आणि जातियवादी सहजयोगात टिकू शकत नाहीत.

उथळ सहजयोगी नको. आपल्या हृदयांत जर काही जातीयवाद असेल तर कृपा करून तो काढून टाका असे त्या म्हणाल्या. "माझा चेहरा खूप गोरा असेल पण माझे हात काळे आहेत. श्री महाकालीचे एक नाव असे आहे की तिचे हात काळे आहेत."

19 जूनच्या दुस-या जाहीर कार्यक्रमाच्यावेळी श्री माताजींचे आगमन होईपर्यंत सहजयोगाची ओळख करून दिली. भाषणानंतर श्रोत्यांना - सोळाशे लोक होते असे श्री माताजी म्हणाल्या श्री माताजींनी आत्मसाक्षात्कार दिला. याला नवीन साधकांकडून उत्कट आणि उत्साही प्रतिसाद मिळाला. बरेचजण स्वतः श्री माताजींकडे गेले व त्यांचा आदर व्यक्त करून सॅन डिॲंगोला भेट दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. सॅन डिॲंगोमधील साधकांची गुणवत्ता पाहून श्री माताजी खूप झाल्या.

"सॅन डिॲगो" म्हणजे "देवांचे शहर" अस त्या म्हणाल्या. भाषणाच्या वेळी सहजयोगावर एक आठ आठवड्यांचा कोर्स असेल अस त्या म्हणाल्या फॉलो अप कार्यक्रमाचा प्रतिसाद जवळ जवळ ऐंशी माणसे हा बराच उत्साही दमदार वाटला. वीस जूनला दोन पत्रकारांना श्री माताजींनी दोन तास मुलाखत दिली. शेवटी त्यांनी आत्मसाक्षात्कार घेतला. एक बाई लेखिका होत्या. दुस-या एका स्थानिक साप्ताहिकातर्फे होत्या. मुलाखत खूप समाधानकारक अशी श्री माताजींना वाटली. पश्चिमेकडील वृत्त जगतात चांगल्या प्रकारे केली गेलेली ही मुलाखत होती असे त्यांनी नमूद केले. त्या मुलाखतीनंतर श्री माताजी त्यांची नात आणि काही सहजयोगी खूप मोठया खरेदीला गेले. अमेरिकेची नाभी स्वच्छ करण्यासाठी. करण आणि डेव्हीड श्री माताजींना रात्रीच्या जेवणासाठी यशस्वी कार्यक्रमाचे सांगता साजरी करायला पिझ्झा खायला घेऊन गेले. प्रेमपूर्वक ममतेचे हास्य करत त्या म्हणाल्या की तो सर्वात रूचकर पिझ्झा होता. खरेदीनंतर परत आल्यावर घरी संगीताने त्यांचे स्वागत करण्यात आले. मग त्यांनी बसून नवीन साधकांना कशा प्रकारे सांभाळायचे याबद्दल हृदयापासून भाषण केले.

## फॉलोअपसाठी श्री माताजींनी केलेल्या सूचना

श्री माताजींनी सॅन डिॲगोच्या फॉलोअप कार्यक्रमासाठी केलेल्या सूचना :-

- प्रत्येक योग्याने उदाहरण दाखवले पाहिजे.
- सामुहिकतेची शक्ति दाखवा. लोकांमध्ये भेदभाव असता नये उदा. कोणत्या चक्राला बाधा आहेत ह्याची चर्चा होत असताना एकमेकांशी मतविरोध करू नका. तसेच नवरा बायकोमधले मतविरोध समजता नयेत.
- मुलांनी सभेसाठी येऊ नये.
- स्त्रिया व पुरूष यांचे वेगळे ग्रुप सभेच्या वेळी केले पाहिजेत, जेव्हा सहजयोगाचे अनुभव सांगितले जातील. सहजयोगी त्यांना श्री माताजी त्यांचे चमत्कार याबद्दल सांगू शकता. फोटोतील चमत्कार दाखवू शकता.
- प्रत्येक नव्या माणसाची सर्व माहीती गोळा करून त्यांना नीट प्रकारे जाणून घ्या.
- जर नवीन मंडळींनी त्यांच्या प्रश्नांबद्दल सांगीतले तर जाणिव आणि कळकळ दाखवा. तुम्हालाही असाच प्रश्न होता अस सांगा ते खरे असू दे किंवा नाही.
- बाधा किंवा भूतांबद्दल सांगून त्यांना घाबरवू नका.
- स्वतःला बंधन देऊ नका. त्यांच्यावर काम करण्यापूर्वी त्यांना तुम्ही बंधन देऊ शकता.

- नवीन लोकांसमोर हसू नका त्यांना वाटेल तुम्ही त्यांची चेष्टा करीत आहांत.
- श्री माताजी आदीशक्ति आहेत हे जास्त आधी सांगू नका.
- चहा द्या मैत्रीचे व उबदार वातावरण निर्माण करा.

श्री माताजी लॉस एंजलीसला 21 ला गेल्या. संध्याकाळी त्यांनी संगीतासाठी विचारले. लॉस एंजलीसच्या काही नवीन सहजयोग्यांनी महाराष्ट्रीयन लोकगीताच्या पध्दतीचे आनंदमय गीत, जे कुंडलीनी जागृत करण्यासाठी सर्व देवतांना आवाहन करते ते म्हटले. त्यामुळे सर्व आनंदीत झाले. गायकाने जेव्हा श्री माताजींना वंदन केल तेव्हा त्यांनी त्याची पाठ थोपटली. श्री माताजी आदीशक्ति आहेत हे जगातल्या सर्व लोकांना सांगणारी भारतीय सहजयोगींच्या कवीतांची टेप, ज्या लोकांना उर्दू समजते आहे त्यांना श्री माताजींबरोबर ऐकण्यास सांगितले. ती इतक्या छान प्रकारे व्यक्त करते की ती खरोखर त्यांना आवडते. दुस-या दिवशी सकाळी विमानतळावर जाताना घरातून बाहेर निघते वेळेचे त्यांचे शब्द होते "ध्यान करा, ध्यान करा, ध्यान करा."

मायामी

श्री माताजी लॉस एंजलीसहून 22 ला विमानाने निघून मायामीला आल्या. गेल्या वर्षी कोलम्बियाला भेट देताना मिळालेल्या त्यांच्या चैतन्य लहरींनी ही जागा बरीच स्वच्छ केली होती. त्यांनी नुसते म्हटले होते की त्यांना बॅबिटला भेटायचे होते. खरोखरच शेवटच्या क्षणी काही कार्यक्रम निघून त्याप्रमाणे स्वतःहूनच बॅबिट तिथे आली होती. पूर्ण पूर्व किनारा हवेमुळे बंद झाला होता. श्री माताजींच्या पश्चात काही होत होतं त्याचच हे प्रतिबिंब होतं. त्यामुळे बॅबिटला तिचं विमान निघण्यासाठी न्यूयार्क विमानतळावर तीन तास थांबावे लागले पण श्री माताजींच्या थोडा वेळ आधीच ती आली. डॉ. बोगदान यु.के.हून परस्पर आले होते. ते सुध्दा या अडचणीमुळे उशीरा आले होते. केसच्या मध्यभागी रात्री त्यांच्या घराकडे येणारा रस्ता नसतांना, फोन नसतांना त्यांना बोलावणे आणि याच त्यांना आश्चर्य वाटत होते. एक पोलिस ऑफीसर आला व त्याने सांगितले की तुमच्या आईला तुम्ही अमेरीकेत हवे आहात, म्हणून त्यांनी रात्रीत सर्व काही तयारी केली व ते आले.

फोर्ट लॉडरडेलमध्ये राहाणारा पॅट्रिक हा एकच सहजयोगी होता. पूर्व आणि पश्चिम किना-याहून ही सहजयोगी मंडळी त्याला मदत करण्यास आली. त्यांच्याकडून त्याला फार मदत मिळाली. श्री माताजींच्या आगमनाआधी विजेचा झोत सतत आकाशात फिरत होता ती वीज व मोठे वादळ यांनी श्री माताजींच्या आगमनासाठी ही जागा शुध्द करण्यास मदत केली. मायामीमध्ये असलेल्या प्रश्नांबद्दल त्याने श्री माताजींना थोडक्यात सांगितल. म्हणजे त्यांचे लक्ष त्यावर मुख्यत्वे

अंमली पदार्थांच्या प्रश्नावर काम करू शकेल. (नंतर न्यूयॉर्कमध्ये 5 जुलैच्या वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की फोर्ट लॉडरडेल येथे पोलीसांनी 220 बंदी अंमली पदार्थांबाबतच्या गुन्हयात पकडले.)

संध्याकाळचा कार्यक्रम "रमाडा इन" हॉटेलमध्ये झाला. तिथे 150 लोक त्यांना भेटायला व आत्मसाक्षात्कार घेण्यासाठी आले. त्यांच्या भाषणांना एक फंडामेंटालिस्ट ख्रिस्ती, बायबलमधले उतारे सांगून निरर्थक बडबड करू लागला. पण श्री माताजींना ख्रिस्ताबद्दल इतके ठासून सांगितल की पूर्ण जमाव त्या माणसासकट मंत्रमुग्ध आणि गप्प बसला. बहुतेकांना आत्मसाक्षात्कार मिळाला. ज्यांना तो मिळालेला समजला नाही ते सर्वांना शेवटी व्यासपीठावर आले आणि अनुभूति घेऊन सर्वांनी त्यांचे आभार मानले.

**बोगोटा**

श्री माताजी बोगोटामध्ये आल्यावर विमानतळावर अपूर्व स्वागत त्यांची वाट पहात होतं. सहजयोगी तिथे आले होते. त्यांच्या स्वागता प्रित्यर्थ त्यांनी कोलंबीयन लोकनृत्ये केली. ती बरीचशी महाराष्ट्रीयन नृत्यांसारखी वाटत होती असा अभिप्राय श्री माताजींनी दिला. रविवारी दुपारी पूजा व्हावयाची होती पण टी.व्ही आणि वृत्तपत्रांच्या मुलाखतीमुळे ती लांबणीवर पडली. मुलाखती फार चांगल्या झाल्या. ओसे व इतरांनी भजन गात असताना रेकॉर्डींग झाले. देशभर मुख्य वेळात होणा-या टेलेकास्टमध्ये बातम्यांच्या वेळी तीन मिनिटे व दीड मिनिटे असे हे टेलेकास्ट दाखवले गेले व त्याच्या शेवटी जाहीर कार्यक्रमाची जागा व वेळ सांगण्यात आली. सभागृह 1200 साधकांनी तुडुंब भरलेल होत. त्यापैकी 80 जणांनी श्री माताजींनी योजलेला फॉलो अपच्या कार्यक्रमाला हजर राहाण्यासाठी दुपारी कामाची सुट्टी घेतली. कोलंबियामधल्या सहजयोगाची वाढ होण्यासाठी त्या दिवशी श्री गणेशाची पूजा करण्यात आली.

**ब्राझील**

दिलीओने सल्वाडोरमध्ये कार्यक्रम आयोजित केला होता. 600 मंडळी हजर होती आणि ब्राझीलला 1500 आले होते. श्री माताजींचा मुक्काम सल्वाडोरमध्ये दिलीओच्या घरी होता.

ब्राझीलया ही ब्राझीलची राजधानी. इथे 800 शाखा व धर्म नोंदविलेले आहेत. वर्तमानपत्रात चांगले लेख छापून आले व सरकारने या भेटीला पाठींबा दिला.

रियोमध्ये ब्रुनो व जॉन (या ऑस्ट्रीयात रहाणा-या अर्जेंटियन सहजयोगींनी) हा कार्यक्रम आयोजित केला. ब्रुनोच्या सौभाग्यवती म्हणजे जपानी संस्कृति आणि कार्यक्षमता याच उत्तम उदाहरण. श्री माताजींनी या छोटया दौ-यात त्यांची चांगली काळजी घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

पुढच्या वर्षी उरुग्वे, चिली आणि युकाडोर इथेही दौरा होईल.

श्री माताजी म्हणाल्या दिलीओ आणि ब्रिजीट यांनी नेतेपदाचे अभूतपूर्व उदाहरण दाखविले आहे. पूर्ण विश्वास व निश्चयाने स्वतःचे पैसे खर्च करून दक्षिण अमेरीकेचा दौरा यशस्वी करण्यासाठी त्यांनी काम केले. दिलीओला अतोनात परीश्रम व कळकळीसह ब्राझीलमध्ये दैवी कार्य करण्यासाठी वाट काढल्याबद्दल खूप आशिर्वाद मिळाले. एक पाच मिलीयन डॉलर्सचे हॉटेल बांधण्याचे कंत्राट त्याला मिळाले.

**न्यूयॉर्कला पुनर्भेट -**

ज्यॉन बरोबर (ऑस्ट्रेलियांतील अर्जेंटाइन सहजयोगी) श्री माताजी न्यूयॉर्क मध्ये 4 जुलैच्या सकाळी आल्या. देशभरच्या सहजयोगी मंडळींनी त्यांचं स्वागत केलं.

ब्राझीलहून त्यांनी सुंदरशा चामडयाच्या वस्तू भेट म्हणून आणल्या होत्या. बायकांसाठी हॅण्डबॅग्ज आणि पुरूषांसाठी ओव्हरनाईट बॅग्ज.

श्री. पूर्णेंदु चॅटर्जी यांच्या अपार्टमेंटमध्ये मॅनहॅटनच्या कॉर्पोरेट वर्ल्डच्या प्रतिनिधींना आत्मसाक्षात्कार देण्यामधे दुपार गेली.

हडसन कडे पहाणा-या यू.नो. प्लाझा हॉटेलच्या कक्षांमध्ये संध्याकाळ घालवली. श्री माताजी च्या सहवासांत नेत्रादिपक रोषणाई व फटाक्यांची आतिषबाजी दाखविली गेली. श्री माताजींनी सहजयोगीमंडळींबरोबर न्यूयॉर्कचे प्रश्न व त्यांना कशाप्रकारे तोंड दयायचे याबद्दल सांगितले. हे संभाषण टेपवर मिळण्यासारखे आहे. दुपारी 12.30 ते 3 पर्यंत युनायटेड नेशन्सचा कार्यक्रम झाला. जे तीस राजकीय मुत्सद्दी (डिप्लोमॅट) त्याला हजर होते त्यांनी सहजयोगी मंडळी घेणार असलेल्या फॉलोअप कोर्समध्ये सुध्दां नांवें नोंदविली आहेत.

संध्याकाळी श्री माताजी त्यांची नात आराधना हीच्यासह यु.के. ला परत गेल्या. अशाप्रकारे अमेरीकेचाझंझावाती व यशस्वी दौरा पार पडला.

**ऑस्ट्रेलियामधील रेडिओ सहज -**

श्री माताजींच्या कृपेमध्ये खरोखर खळबळजनक गोष्टी ब्रिस्बेनमध्ये घडत आहेत. रेडिओ सहजयोगी मंडळींचे 4ZZZ वर दोन कार्यक्रम ध्वनीक्षेपीत होत आहेत 4ZZZ हे दक्षीणपूर्व क्वीनलॅण्ड या भागांतील युवकांचे रेडिओ स्टेशन आहे. प्रथम आकाशवाणीवर जेसन कोपलँड यांचा " दी बीग वाइल्ट कर्ड" हा आंतरराष्ट्रीय संबंध व परकीय धोरणावरचा अर्ध्या तासाचा कार्यक्रम शुक्रवारी ६ अडीच वाजता झाला. गेल्या वर्षीच्या नाताळाच्या कार्यक्रमाच्या वेळी श्री. सी. पी. श्रीवास्तव यांनी

गणपतीपुळे इथे दिलेल्या भाषणाचा सारांश या कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिला होता. त्यांत त्यानी म्हटले होते की जगांत सगळीकडे शांततेला सुरुवात होते आहे असे वाटते.

या कार्यक्रमामुळे दर आठवड्याला अर्ध्या तासाचा वेळ सहज कार्यक्रमाला मिळावा अशा वाटाघाटी चालू आहेत. या कार्यक्रमासांठी लिहीणे, मजकूर जमवणे हे सर्व चालू झाले आहे. "टवेंटी फर्स्ट सेंचुरी लिफ्ट ऑफ " असं या कार्यक्रमाचं नांव असेल, या मध्ये धार्मिक, तत्वज्ञान, नैतिक, जागतिक, ऐतिहासिक, असे वेगवेगळे महत्वाचे मुद्दे सहज योगाची उत्तम प्रकारे जाहिरात होण्याच्या दृष्टीने हाताळले जातील. श्री माताजी सप्टेम्बर मध्ये ब्रिस्बेनला येतील त्यावेळी हा कार्यक्रम तयार होऊन ध्वनिक्षेपीत होत असेल असे वाटते.

जगभरचे सहजयोगी या साठी मदत करू शकतील. कोणाकडे यासाठी उपयोगी माहिती असेल (अर्थात तुमच्याकडे आहेच।) तर मिळेल तितकी आम्हाला हवी आहे. दोन मुख्य गरजा आहेत. जेसनच्या कार्यक्रमासाठी जागतिक परिस्थिती वरचं साहित्य हवं आहे. तेव्हां कोणाकडे श्री माताजींचे किंवा श्री.सी.पी.चे लिखाण किंवा टेप जे या विषयावर आहे. ज्यामध्ये निरनिराळ्या देशांचा चकाशी संबंध किंवा सामाजिक, उत्क्रांतीबद्दल त्यांच्या प्रतीच स्वागत होईल आणि 21 व्या शतकांसाठी लेखनाच्या कल्पना श्री माताजींचे ध्वनिमुद्रित केलेल्या न केलेल्या शब्दांसकट, तुम्हाला होऊ शकेल ते पूर्ण केलेलं लिखाण सर्व काही चालेल. (Jason Capeland) 29, Haughton

4ZZZ हे युवा स्टेशन असल्यामुळे आणि आमची वेळ दुपारी असल्यामुळे आम्हाला ते जलद आणि जास्त इनफॉर्मल ठेवायच आहे. तरीही आम्ही काही गहन गोष्टी स्पष्ट करणार आहोत. मधून मधून चांगली व्हायब्रेशन्स असलेलं संगीत घालून चांगला संदेश देणार. तेव्हा संपर्क साधा - जेसन कोपलॅण्ड, (Jason Copeland) 29, Haughton Street, Red Hill, Brisbane, Qacensland 4059, Australia Tel(7) 369 8849.

श्री विष्णुमाया शक्तिने ध्वनि लहरींना व्हायब्रेशन्स देऊन आम्हाला मार्गदर्शन करावे व आशिर्वाद द्यावे. आमची आई, श्री आदिशक्ति हिची चिरंतन ओळख पटून तिचा मुक्तिचा संदेश सर्व जगाला मिळावा.

जेसन कोपलॅण्ड
ऑस्ट्रेलिया